**शासनामार्फत वाळू / रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचे सर्वंकष धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : गौखनि-१०/१२२२/प्र.क्र.८२/ख-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १९ एप्रिल, २०२३

वाचा :-

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील प्रकरण पाच.
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक : गौखनि-१०/१०२१/प्र.क्र.८२/ख-१ दिनांक २८ जानेवारी, २०२२

प्रस्तावना :-

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण पाच मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू/रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून, नियम ७० मध्ये, “लिलाव, विनियोग इत्यादीच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपध्दती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विर्निदीष्ट करण्यात येईल,” अशी तरतूद केली आहे.

वाळू उत्खननासाठी निविदा किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवूनये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते.

महाराष्ट्रातील नद्या व धरणांमध्ये मोठ्याप्रमाणात वाळूचे साठे आहेत. गेल्या काही वर्षामध्ये असेही निदर्शनास आले आहे की, पावसाळ्यामध्ये नदीतील वाळूच्या साठ्यामुळे काही अंशी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच, धरणामधील गाळ, गाळमिश्रित वाळू यामुळे धरणाची पाणी साठवणूक क्षमता दिवसें दिवस कमी होत आहे. त्यामुळे नदी व धरणातील गाळ, गाळमिश्रीत वाळू काढण्यासाठी जलसंपदा विभागाशी अनौपचारिकरित्या चर्चा करण्यात आली होती. जलसंपदा विभागाच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले होते की, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक २८/०३/२०२० च्या अधिसूचने अन्वये नदीपात्रातील गाळ, गाळ मिश्रीत वाळू काढणे, धरणातील गाळ काढणे (Dredging and De-silting of dams, rivers, canals etc.) याकरीता पर्यावरण अनुमती घेण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. व अशा प्रकारची कार्यवाही ही यांत्रिकी पद्धतीने करता येवू शकते. तथापि, यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. तसेच, खनिकर्म महामंडळ, नागपूर यांनाही या अनुषंगाने विचारणा केली असता त्यांनीही असमर्थता दर्शविली आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या खनिकर्म विभागाने मार्च,२०१८ मध्ये Sand Mining Framework-२०१८ प्रसिद्ध केले, त्यामध्ये देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन वाळू/ रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबींसंदर्भात काही दिशानिर्देश दिले. तसेच मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) यांनी O.A.No.३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व Sand Mining Framework,२०१८ नुसार धोरणात अनुकुल बदल करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याशी समन्वय साधून नवीन वाळू/ रेती निर्गती धोरण तयार करण्यासाठी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करुन काही ठळक राज्यांच्या वाळू धोरणांचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार दि.२८/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन सुधारित वाळू/ रेती निर्गती धोरण निर्गमित करण्यात आले होते. सदर वाळू/रेती धोरण

अधिक्रमित करुन राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती उपलब्ध करुन देणे व अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत रेती उत्खनन, साठवणूक व्यवस्थापन व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्याबाबतचे सर्वकष धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : गौखनि-१०/१०२१/प्र.क्र.८२/ख-१ दिनांक २८/०१/२०२२ रोजी निर्गमित केलेले वाळू/रेती निर्गती सुधारित धोरण अधिक्रमित करुन राज्यातील नागरिकांना बांधकाम योग्य वाळू स्वस्त दराने उपलब्ध करुन देणे तसेच अनाधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी यांचे स्तरावर समिती स्थापन करुन शासनामार्फत वाळू/रेतीचे उत्खनन, साठवणूक व विक्री व्यवस्थापन करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी शासन पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करीत आहे.

**प्रकरण क्रमांक - एक**

I] **वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती :**

**अ). महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी खाडीपात्रातील वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती :-**

१) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वेळोवळी वाळू/रेतीचे उत्खनन करणे आवश्यक असल्याने, अशा ठिकाणातील वाळू उत्खननाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दरवर्षी “मे” महिन्यापर्यंत उपलब्ध असलेल्या सर्वेक्षण डेटाच्या आधारे वाळू/रेतीगट निश्चित करावेत,

२) सागरी किनारपट्टी क्षेत्रात (Coastal Regulation Zone) **यांत्रिकी/ड्रेजर पध्दतीने** वाळू/रेती उत्खननासाठी महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची (Maharashtra Coastal Zone Management Authority) पूर्व मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी घेणे आवश्यक राहील"

३) नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी ज्या गटात वाळू/रेती उत्खननासाठी ड्रेझर सारख्या यांत्रिक साधनांचा वापर करणे आवश्यक असल्यास त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यावतीने संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी जिल्हास्तरीय वाळू नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार “यांत्रिक साधनाव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट” असे चिन्हांकित करतील.

४) सागरी विनियमन क्षेत्रामध्ये येणा-या खाडी क्षेत्रात वाळूचे उत्खनन व वाहतूक करण्यासाठी केंद्र शासनाच्या पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्रालय यांनी निर्गमित केलेले Dredging Guidelines for Major Ports, २०२१ यांमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार निविदा तयार करावी तसेच, Geophysical व Geotechanical Investigation नुसार उत्खननांची प्रक्रिया राबविण्यात यावी.

५) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार Accredited Environment Consultant ची नेमणूक करण्यात येईल. "पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत सादर करावा"

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सूकर करण्यासाठी वाळू उत्खनन करावयाच्या क्षेत्रात वाळू / रेती गट, त्यांचे भौगोलिक स्थान, वाळू / रेतीचा अंदाजित साठा, नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी

करावयाच्या उत्खननाचे परिमाण व उपलब्ध पोचमार्ग इत्यादी निश्चित केल्यानंतर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यावतीने निश्चित करण्यात आलेल्या वाळू / रेती गटातून वाळू/रेती उत्खननाची व्यवस्था करण्यास व सदर व्यवस्थेवर सनियंत्रण ठेवण्यास संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करतील.

७) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींना त्यांच्या पारंपारिक व्यवसाय करणे शक्य व्हावे म्हणून सागरी किनारपट्टी/खाडी येथील Intertidal क्षेत्रातील डूबी / हातपाटी पध्दतीने वाळू/रेतीचे उत्खनन करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचे वतीने संबंधित जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी जिल्हास्तरीय वाळू नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार "विनानिविदा परवाना पध्दतीने डूबी / हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट " असे चिन्हांकित करुन अंतीम निर्णय घेतील.

**ब] <u>नदीपात्रातील वाळू/रेती गटांचे सर्वेक्षण व निश्चिती</u> :-**

१) नदी पात्रातील वाळूगटांचे स्थळनिरीक्षण करण्याची कार्यवाही खालील तांत्रिक उपसमिती मार्फत करण्यात येईल:-

| | | |
|---|---|---|
| १. | तहसिलदार | अध्यक्ष |
| २. | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूविज्ञान खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे मार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| ५. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |

२) तांत्रिक उप समितीने अवर्षण व सतत टंचाईग्रस्त भागात वाळू उत्खननामुळे पर्यावरण तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास अशा भागात वाळू/ रेती गट निश्चित करु नये.

३) सदर तांत्रिक उप समितीमार्फत वाळूगट निश्चित करताना स्थानिक पर्जन्यमान तसेच भौगोलिक परिस्थिती व इतर पर्यावरण विषयक अनुकूल बाबीं, वाळू निर्मिती (Replenishment) याचा विचार करुनच वाळूगट उत्खननासाठी योग्य आहेत किंवा कसे, याबाबत तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समितीस शिफारस करील.

**II] <u>वाळू सनियंत्रण समिती</u>:-**

**(१) तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समिती -**

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समिती (Taluka Sand Monitoring Committee) स्थापन करण्यात येईल. (सदर समितीचा उल्लेख यापुढे "तालुकास्तरीय समिती" म्हणून करण्यात येईल.) सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप विभागीय पोलीस अधिकारी | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे मार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| ५. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ७. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | तहसिलदार | सदस्य सचिव |

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

**तालुकास्तरीय वाळू / रेती सनियंत्रण समितीचे अधिकार व कार्ये :-**

१) तालुकास्तरीय समितीची बैठक दोन महिन्यात किमान एकदा घेण्यात यावी.

२) तालुका स्तरीय समितीने त्यांच्या क्षेत्रातील निविदेकरीता उपलब्ध असलेले वाळू गट निश्चित करुन तशी शिफारस जिल्हास्तरीय समितीला करील.

३) तालुकास्तरीय समिती वाळू उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळूगटातून उत्खननाचे अंदाजीत परिमाण ठरवेल. वाळूगट निश्चित करताना सदर गटाचे अक्षांश रेखांशासह प्रमाणित नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

४) तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय समितीस Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार District Survey Report तयार करण्यास सहकार्य करील.

५) तालुकास्तरीय समितीने निश्चित केलेल्या वाळूगटाचे निरसन ऑनलाईन ई- निविदा पध्दतीने जाहीर करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीस सादर करील.

६) सदर समिती पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीनुसार वाळूगटातून उत्खनन होत आहे किंवा कसे याबाबत सनियंत्रण व पर्यवेक्षण करील.

७) सदर समिती या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शिफारशी जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीस करील.

८) कार्यक्षेत्रात उपलब्ध असणारे वाळूसाठे शोधणे तसेच नदीपात्रातील वाळू उत्खननाला पर्याय म्हणून इतर स्रोत शोधणे (जसे मातीमिश्रीत वाळू, धरणातील वाळू इ.) याबाबतही समिती शिफारस करील.

९) सदर समिती अधिसूचित क्षेत्रासाठी पेसा कायदा, २०११ मधील तरतूदीनुसार किंवा त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार रेतीगटांचे निर्धारण करील.

१०) वरील व्यतिरिक्त तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

तालुकास्तरीय सनियंत्रण समिती वर उल्लेख केलेल्या बाबींची माहिती जिल्हा सनियंत्रण समितीस सादर करतील.

(२) <u>जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती</u> -

प्रत्येक जिल्ह्यामध्ये वाळू/रेती निर्गती संबंधी संपूर्ण प्रक्रियेचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा वाळू सनियंत्रण समिती (District Sand Monitoring Committee) गठीत करण्यात येईल. (यापुढे ज्याचा उल्लेख “जिल्हास्तरीय समिती” म्हणून करण्यात येईल.) सदर समितीची संरचना पुढीलप्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त | सदस्य |
| ४. | अपर जिल्हाधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५. | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ७. | उप वनसंरक्षक | सदस्य |
| ८. | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| १०. | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| ११. | महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे प्रतिनिधी (खाडी क्षेत्रासाठी) | सदस्य |
| १२. | जिल्हा खनिकर्म अधिकारी | सदस्य सचिव |

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष, अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

**जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे अधिकार व कार्ये :-**

१) सदर समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेणे आवश्यक राहील.

२) योग्य सनियंत्रणाकरीता समितीला जिल्ह्यातील वाळूगटांचे Digitization महाराष्ट्र सुदूर संवेदन यंत्रणा अथवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत आवश्यकतेनुसार करता येईल.

३) तालुकास्तरीय समित्यांकडून प्राप्त प्रस्तावांवर विचार करुन तसेच आवश्यकता असल्यास त्यामध्ये आवश्यक ते बदल करून, जिल्हास्तरीय समिती खालीलप्रमाणे कार्यवाही करील:-

i) वाळू डेपोमध्ये वाळूसाठा उपलब्ध करुन घेण्यासाठी वाळूगट निश्चित करतील.

ii) हातपाटी/डूबी यासारख्या पारंपारिक पध्दतीने वाळू काढण्यासाठी स्थानिक व्यक्ती तसेच स्थानिक संस्थांना परवाना देण्याकरीता वाळूगट राखीव ठेवतील.

४) उपरोक्त नमूद प्रयोजनार्थ वाळूगटांच्या पर्यावरणविषयक मान्यतेसाठी शिफारस प्रदान करतील.

५) वाळूगट निश्चिती व उत्खननाबाबत सर्व कार्यपद्धती ही मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार राहील याची दक्षता घेईल.

६) पर्यावरणविषयक अनुमती व त्याबाबतच्या अन्य कामांसाठी व District Survey Report तयार करण्यासाठी मान्यताप्राप्त सल्लागाराची नेमणूक करण्याचे अधिकार सदर समितीस असतील.

७) सदर समिती वाळू/रेती उत्खनन/विकसन व वाहतूकीबाबत आवश्यकतेनुसार यथायोग्य निर्णय घेईल.

८) या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सदर समिती जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय तथा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करतील.

९) या धोरणाच्या अनुषंगाने निर्धारित केलेल्या तरतूदी, अटी व शर्तींच्या अधिन राहून सदर समिती वाळूगटांतून वाळू उत्खनन व वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्यास निविदेद्वारे मंजूरी देण्याबाबत जिल्हाधिकारी यांना शिफारस करील.

१०) राज्यातील पूर परिस्थितीचा धोका कमी करणे, नदीचा प्रवाह पूर्ववत/सुरळीत करणे यासारख्या बाबींसाठी जलसंपदा विभागाने नदी पात्रातील काही गट/स्थळ निश्चित केल्यास अशा ठिकाणाहून गाळ, गाळ मिश्रित वाळू काढण्याबाबत जलसंपदा विभाग जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करु शकेल. त्याचप्रमाणे खाडीपात्राकरीता महाराष्ट्र सागरी मंडळही जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करु शकेल अथवा खाडीतील प्रवाह सुयोग्य राखण्यासाठी मंडळाने उत्खनन केल्यास त्यातील वाळू वरीलप्रमाणे नागरीकांना विक्री करता येईल.

III) <u>ग्रामसभेची शिफारस</u> -

नदी पात्रातील वाळू गट निश्चित केल्यानंतर सदर वाळूगटातून वाळूचे उत्खनन व वाहतूकीच्या निविदेसाठी ग्रामसभेची शिफारस घेणे अनिवार्य राहील. ग्रामपंचायतीकडे संदर्भ प्राप्त झाल्यानंतर ग्रामसभा बोलावून त्यावर १ महिन्याच्या आत निर्णय घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहील. ग्रामसभेने नकारात्मक ठराव दिल्यास उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली पुढील १० दिवसात ग्रामसभा आयोजित करण्यात यावी व त्यांच्या शिफारशी आधारे गुणवत्तेनुसार वाळूगटातून वाळू उत्खनन करुन ती वाळू डेपोपर्यंत पोहोचविण्याकरीता निविदा काढण्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीला तातडीने सादर करण्यात येईल.

IV] <u>केंद्र/राज्य शासनाच्या मोठ्या प्रकल्पांकरीता वाळू उपलब्ध करुन देणे:-</u>

केंद्र/राज्य शासनाच्या मोठ्या प्रकल्पाकरीता वाळू उपलब्ध व्हावी म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील सुयोग्य असा वाळू गट/घाट राखून ठेवावा. संबंधित विभागाने मागणी केल्यास तो गट/घाट त्या विभागास नियमानुसार उपलब्ध करुन द्यावा.

V] प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेली यादी संबंधित तहसिलदार यांनी तपासून तशी लेखी परवानगी दिल्यानंतर वाळू डेपोतून विनामुल्य वाळू उपलब्ध करुन देण्यात येईल. वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यास करावा लागेल.

## प्रकरण क्रमांक - दोन

I] <u>वाळू/रेती उत्खननासाठी खाणकाम आराखडा</u> -

Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वाळूगटांचा योग्य त्या कालावधीचा खाणकाम आराखडा तयार करतील.

II] <u>पर्यावरण अनुमती</u> -

**अ) खाडी पात्रातील वाळूगटांमधून वाळू / रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती -**

१) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार व मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी अर्ज क्र.३४ (टीएचसी)/२०१३ (डब्लूझेड) मध्ये दिनांक २९.०५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार वाळू/रेती उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील (EIA Notification -२००६) तरतुदीनुसार, पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी करणे आवश्यक राहील. पर्यावरण विभागाच्या सहमतीने ३ वर्षापर्यंत पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) "विनालिलाव परवाना पध्दतीने खाडीपात्रातील वाळू गट हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक नाही. याबाबत संबधित जिल्हाधिकारी यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक २४/११/२०२२ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

**ब) नदी पात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती -**

१) मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी

निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार पर्यावरण अनुमती व अनुषंगीक बाबींबद्दल कार्यवाही करणे आवश्यक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

२) वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या अधिसूचनेनुसार त्या-त्या वेळी कार्यक्षेत्र असलेली तज्ञ मूल्यांकन समिती (Expert Appraisal Committee) व पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्यासाठी जिल्ह्यातील वाळूगटाचे प्रस्ताव सर्वेक्षणानुसार विहीत केलेल्या फॉर्म मध्ये प्रकल्प प्रवर्तक म्हणून जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडून अशा समितीसमोर सादर करण्यात यावेत. पर्यावरण विभागाच्या सहमतीने ३ वर्षापर्यंत पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३) पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यकतेनुसार Accredited Environment Consultant ची नेमणूक करण्यात येईल. यासाठी येणारा खर्च जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून पर्यावरणासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविता येईल.

४) सदर प्रस्ताव ज्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतील, त्या बैठकीस Accredited Environment Consultant यांच्यासह जिल्हा खनिकर्म अधिकारी हे स्वत: उपस्थित राहतील.

५) प्रकल्प प्रवर्तक म्हणून प्रकरणपरत्वे यथास्थिती पर्यावरण समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पदनामाने पर्यावरण अनुमती प्राप्त होईल.

६) वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या अधिसूचनेनुसार त्या-त्या वेळी कार्यक्षेत्र असलेल्या तज्ञ मूल्यांकन समिती (Expert Appraisal Committee) व पर्यावरण परिणाम व्यवस्थापन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्याची प्रक्रिया वाळूगट निश्चितीनंतर करण्यात यावी.

## प्रकरण क्रमांक - तीन

**I] निविदा धारकांसाठी आवश्यक पात्रता :**

**अ) वाळूगटांतून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक व डेपो व्यवस्थापन करण्याकरीता निविदाधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता**

१) कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी / संस्था निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास खालील कारणास्तव अपात्र असतील :-

a. वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतिमंद व्यक्ती किंवा
b. केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केलेल्या व्यक्ती किंवा
c. यापुर्वी गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची थकबाकी किंवा मृतभाटकाची रक्कम (Dead Rent) थकविण्यात आली असणारी व्यक्ती / संस्था या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गौण खनिजाचे स्वामीत्वधन, मृतभाटक रक्कम, किंवा शासनाच्या महसूलाची थकबाकीदारांची यादी वेळोवेळी तयार करण्यात येवून ती प्रसिद्ध करण्यात यावी.
d. नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाचे अवैध उत्खनन किंवा वाहतूक केल्याबाबत न्यायालयाकडून शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती / संस्था
e. लगतपूर्वीच्या आर्थिक वर्षातील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यास

२) निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे मागील ३ वर्षाचा नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक, वस्तू व सेवाकर विभागाचा GSTIN क्रमांक असणे आवश्यक राहील.

३) वाळूगटांतून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्यासाठी निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तीं/संस्था यांना निविदा अर्जाचे शुल्क रु.५,०००/- संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या नावाने ऑनलाईन(Online) पद्धतीने किंवा जिल्हाधिकारी सूचित करतील त्या पध्दतीने भरावी लागेल.

४) निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत अनामत रक्कम (EMD) म्हणून रु. ५.०० लक्ष इतकी रक्कम भरावी लागेल.

II] <u>वाळूगटातून वाळूचे उत्खनन, वाहतूक व साठवणूक करण्याच्या निविदेकरीता अधिकारिता</u>:-

१) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांतून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्यासाठी निविदा प्रक्रिया जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली राबविण्यात यावी.

२) एखादा वाळूगट एका महसूल विभागातील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन संयुक्त वाळूगट म्हणून निश्चिती करावी आणि यासंबंधीचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा. तद्नंतर विभागीय आयुक्त दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास अशा संयुक्त वाळूगटाबाबत कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटांतून वाळू उत्खनन, वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, वाळू डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवावी.

३) एखादा वाळूगट दोन महसूल विभागामधील दोन जिल्ह्यामध्ये संयुक्तरित्या येत असेल तर अशा प्रकरणांत सुध्दा दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन, यासंबंधीचा अहवाल संबंधित दोन्ही विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त हे सल्लामसलत करुन, दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास उक्त निविदा प्रक्रियेची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटांतून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक, वाळू डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्याच्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करावी. अशा संयुक्त वाळूगटाबाबतच्या निविदा प्रक्रियेविषयी दोन्ही विभागीय आयुक्त यांचे एकमत न झाल्यास त्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करण्यात यावा.याबाबत शासनाचा निर्णय अंतीम राहील.

III] <u>**वाळू/रेती उत्खनन, वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन करण्याची कार्यपध्दती :-**</u>

१. वाळूगटातून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या बांधकाम योग्य वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती, व्यवस्थापन यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२. वाळूगटांचा उत्खननाचा कालावधी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातवरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेवून जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावा. तसेच वाळूगटाचे क्षेत्र ५ हेक्टर पर्यंत किंवा सदर गटात उत्खननासाठी उपलब्ध वाळूसाठ्यानुसार निश्चित करण्यात यावा. वाळूगट निश्चितीची प्रक्रिया, गटातील वाळू उत्खननाची प्रक्रिया पुढीलप्रमाणे राहील:-

अ) खाणकाम आराखड्यातील त्या त्या वर्षासाठी केलेल्या वार्षिक नियोजनानुसार संबंधित वाळूगटाच्या नकाशावर व प्रत्यक्ष क्षेत्रस्तरावर त्या त्या वर्षातून करावयाच्या उत्खननाबाबत हद्दी निश्चित करण्यात याव्यात व याप्रमाणे निविदा कालावधीत करावयाच्या उत्खननाचे नियोजन करण्यात यावे.

ब) खाणकाम आराखड्याप्रमाणे उत्खनन पूर्ण झालेल्या भागामध्ये पुन्हा कोणतेही उत्खनन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

## प्रकरण क्रमांक- चार

## निविदा प्रक्रियेसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे

१) नदी/खाडीपात्रातील वाळूगटातून वाळू उत्खनन व उत्खनन केलेल्या बांधकाम योग्य वाळूची, वाळू डेपोपर्यंत वाहतूक, वाळू डेपो निर्मिती व व्यवस्थापन यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) निविदेची जाहिरात जिल्ह्यातील दोन प्रमुख वर्तमानपत्रात निविदा काढण्यापूर्वी किमान १५ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात यावी. त्याच्या प्रती सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात याव्यात. तसेच जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

३) प्रस्तावित निविदासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी व संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांनी त्याची तपासणी / चौकशी करावी व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित वाळूगटाच्या निविदेच्या प्रक्रियेबाबत योग्य तो निर्णय घेतील.

४) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांची निविदा प्रक्रिया संबंधीत जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली पार पाडण्यात यावी. जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

५) संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत संबंधीत विभागीय आयुक्त यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली निविदेची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. विभागीय आयुक्त यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

६) ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेर निविदा प्रक्रिया अवलंबविण्यात यावी. अशा प्रकारे ३ वेळा निविदा प्रक्रीया राबवूणही ३ किंवा ३ पेक्षा जास्त निविदा प्राप्त न झाल्यास प्राप्त निविदा स्विकारावयाच्या किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार यथास्थितीत जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांना असतील.

७) निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ प्रसिध्द करण्यात यावा.

८) यामध्ये सर्वात कमी दराने प्राप्त होणारी निविदा ही यशस्वी निविदाधारक म्हणून समजली जाईल.

९) सदर यशस्वी बोलीधारकास ०२ दिवसांचे आत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून इरादा पत्र (LOI) देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

१०) निविदा धारकासोबत शासनाचा करारनामा करण्यात येईल. व त्यानंतरच वाळूगटातून वाळू उत्खनन करण्यास व वाळू डेपोमध्ये वाळू आणून साठा करण्यास परवानगी देण्यात येईल.

११) निविदा प्रक्रियेत भाग घेणाऱ्या ज्या व्यक्तीचा देकार / निविदा स्वीकारण्यात आली नसेल, त्यांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी भरलेली अनामत रक्कम (EMD) रु.५.०० लक्ष निविदेची कार्यवाही संपताच तात्काळ परत करण्यात यावी.यशस्वी निविदाधारकाने भरलेली अनामत रक्कम (EMD) रु.५.०० लाख सूरक्षा ठेव म्हणून समायोजित करण्यात यावी.

१२) निविदेतील सर्वात कमी बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती विभागीय आयुक्त यांनी

घ्यावयाचा असून, सदर निर्णय संबंधितास कळविणे आवश्यक राहील. निविदा नाकारावयाचा निर्णय घेतल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदविण्यात यावीत.

**१३)** यशस्वी निविदाधारकासोबत वाळूगटातून वाळू/रेतीच्या उत्खनन, वाळूची वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन निविदेच्या अनुषंगाने करण्यात येणारा करारनामा नोंदणीकृत करण्यात यावा. हा करारनामा इरादा पत्र (LOI) दिल्यानंतर १५ दिवसामध्ये करण्यात यावा.

**१४)** करारनामा केल्यानंतर निविदाधारकास वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा देण्यात यावा. ताबा दिल्यानंतर ३० दिवसाच्या आत उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

**१५)** वाळूगटातून वाळू उत्खनन, वाळू डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व डेपो व्यवस्थापन करणारे संबंधित निविदाधारक यांनी mahakhanij प्रणाली अथवा शासन निर्देशित करेल अशी प्रणाली वापरणे बंधनकारक राहील.

**१६)** वाळू गटातून वाळूचे उत्खनन वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन करणा-या निविदाधारकास प्रत्येक महिन्याच्या अखेरीस वाळू विक्रीच्या ९०% रक्कम विहित नमुन्यात देयक सादर केल्यानंतर अदा करण्यात येईल. उर्वरित रक्कम निविदा धारकाचा निविदा कालावधी समाप्त झाल्यानंतर एकरक्कमी प्रदान करण्यात यावी.

**१७)** विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी हे त्यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शर्तींचा समावेश करण्याची मुभा असेल.

## प्रकरण क्रमांक - पाच
## निविदेच्या अटी व शर्ती

**I] अ) वाळूगटातून वाळूचे उत्खनन, उत्खनननानंतर वाळूची डेपोपर्यंत वाहतूक याबाबत अटी व शर्ती :-**

१) सर्व वाळूगट मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावेत.

२) निविदेचा कमाल कालावधी ३ वर्षापर्यत ( हा पर्यावरण अनुमती मध्ये निर्धारित केलेल्या कालवधीनुसार असेल) अथवा सदर वाळू गटातील वाळू साठा संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी असेल. पर्यावरण अनुमती घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल. पर्यावरण अनुमती संपण्यापूर्वी नुतनीकरण करण्याची कार्यवाही विहित मुदतीत व्हावी याची जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

३) दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर हा पावसाळ्याचा कालावधी असेल व या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही. याची स्पष्ट जाणीव संबंधित निविदाधारकास करुन देण्यात यावी.

४) उत्खननाचा कालावधी निश्चित करताना खालील बाबींचा विचार करण्यात यावा :-

a. वाळूच्या पुनर्भरणाचे वार्षिक मूल्यांकनाचा दर.
b. भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा तसेच पाटबंधारे विभागाचा वाळू उपलब्धतेबाबतचा व्यवहार्यता (feasibility) अहवाल.
c. पर्यावरण अनुमती व खाणकाम आराखड्यात नमूद स्थानिक व भौगोलिक परिस्थिती.
d. Sustainable Sand Mining Guidelines,२०१६, Sand Mining Framework,२०१८ व Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० मधील मार्गदर्शक तत्वे तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना.

५) वाळू/रेती गटातून वाळू उत्खनन व वाहतूक करावयाच्या निविदा जाहिरातीमध्ये उत्खननाचा कालावधी, वाळू/रेती गटाचा सर्वे क्रमांक, वाळू/रेतीगट क्रमांक, वाळू/रेतीगटाचे नाव, वाळू/रेतीगटातील अंदाजित वाळू/ रेतीसाठा या बाबी ठळकपणे नमूद करण्यात याव्यात.

६) वाळूगटातून वाळू डेपोपर्यंत वाळूची वाहतूक "ट्रॅक्टरद्वारे" अथवा कमाल ६ टायरच्या (टिप्पर) वाहना मार्फत करणे बंधनकारक राहील.याबाबत अडचण निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी यांनी तसा प्रस्ताव शासनास सादर करावा.

७) वाळूगटातून ते वाळू डेपोपर्यंत वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस (GPS) यंत्रणा बंधनकारक राहील.

८) वाळूगटातून ते वाळू डेपोपर्यत वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर व ६ टायरच्या टिपरची संख्यां व त्यांचे क्रमांक नोंदणी करुन घेण्यात यावे. या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांद्वारे वाळू वाहतूक केल्याचे आढळून आल्यास अशी वाळू वाहतूक अवैध समजून संबंधित निविदाधारक/कंत्राटधारकांवर दंडात्मक कारवाई करुन नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल..

९) वाळूगटातून ते वाळू डेपोपर्यत वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांचा ट्रॉली व ६ टायर टिपरचा संपूर्ण दर्शनिय भाग पिवळ्या रंगाचा असावा. सदर वाहनाने वाळू डेपो वगळता इतरत्र वाळूची वाहतूक केल्यास सदर वाहन जप्त करुन दंडात्मक कारवाई करुन निविदाधारक, वाहन चालक, मालक यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. वाळू गट/घाटावर वाळू वाहतुकीसाठी नोंद केलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणतेही वाहन Geo- Fence च्या क्षेत्रामध्ये येणार नाही याची दक्षता निविदा धरकाने घ्यावी.

१०) निविदाधारक वाळू उत्खनन करण्यास असमर्थ ठरल्यास अनामत रक्कम/सुरक्षा ठेव रक्कम जप्त करुन निविदा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

११) उत्खननासाठी निश्चित केलेला वाळूभूखंड हा संपूर्ण Geo Fence करणे बंधनकारक राहील.

१२) नदी/खाडीपात्रातील वाळू गटामध्ये सीसीटीव्ही लावणे बंधनकारक राहील.

**II] डेपो निर्मिती व व्यवस्थापन याबाबत अटी व शर्ती**

१) वाळू डेपोमधून महाखनिज अथवा शासन निश्चित करेल त्या Online प्रणालीद्वारे वाळू विक्री करण्यात येईल.

२) वाळू डेपोची निर्मिती करण्यासाठी उपलब्ध असल्यास शासकीय जागेचा वापर करता येईल. शासकीय जागा उपल्ब्ध नसल्यास रस्ता उपलब्ध असलेली खाजगी जमीन भाडे तत्वावर प्रथमत: ३ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी घेण्यात यावी तद्नंतर, आवश्यक कालावधीसाठी नुतनिकरण करता येईल.

३) खाजगी जमीनीसाठी प्रती एकर प्रती वर्षी रुपये ३०,०००/- इतक्या मर्यादेपर्यंत भाडेपट्याची रक्कम अनुज्ञेय राहील.

४) वाळू साठवणूकीच्या वाळू डेपोला काटेरी तारेचे कुंपण करणे बंधनकारक राहील.

५) प्रत्येक वाळू डेपोमध्ये २४/७ छायाचित्रण होण्यासाठी CCTV बसविण्यात यावेत. Weighbridge (वजन काटे) च्या ठिकाणी व वाळू डेपोचे निरिक्षण होईल अशा ठिकाणी CCTV बसविण्यात यावेत.

६) वाळू डेपोमध्ये कंट्रोल रुम, सुरक्षा यंत्रणेची व्यवस्था असावी.

७) वाळू डेपोकरीता विद्युत पुरवठा कार्यान्वीत करुन घेण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

८) काही अपरिहार्य कारणामुळे वाळू डेपो येथील विद्युत पूरवठा खंडीत झाला तर डेपोतील कामकाजावर परिणाम होऊ नये म्हणून आवश्यक त्या क्षमतेचे जनरेटर (Generator) बसविण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

९) वाळू डेपोच्या ठिकाणी Electronic Digital Weighbridge (वजन काटे) बसविणे बंधनकारक राहील.

१०) वाळू डेपो मध्ये वाळू/रेती टाकण्यापुर्वी तसेच, वाळू डेपोमधून ग्राहकांना वाळू वितरित करण्यापुर्वी सदर वाळूचे वजन Weighbridge (वजन काटे) वर करताक्षणी संबंधित निविदा धारक, संबंधीत ग्राहक व शासकीय यंत्रंणांना महाखनिज प्रणालीद्वारे SMS अलर्ट जाईल अशी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक राहील.

११) वाळू डेपोमधून वाळूच्या विक्रीकरीता संगणकीकृत व्यवस्था निर्माण करणे, साठा रजिस्ट्रर, आवक-जावक (विक्री) रजिस्ट्रर संगणकीकृत असणे आवश्यक राहील.

१२) वाळूची विक्री ही मेट्रीक टन या परिमाणानुसार करण्यात यावी.

१३) वाळू डेपोच्या ठिकाणी शिल्लक वाळूसाठा व विक्री केलेल्या वाळूसाठ्याची माहिती महाखनिज या प्रणालीवर दररोज ऑनलाईन पद्धतीने नोंद करणे बंधनकारक राहील

१४) वाळू डेपोमध्ये प्राप्त होणाऱ्या वाळू साठ्यामध्ये खालील मर्यादेपर्यंत घट अनुज्ञेय राहील:-

| **उपलब्ध साठा (मेट्रिक टन)** | | **टक्केवारी** |
|---|---|---|
| ५००० पर्यंत साठा | - | ०५ टक्के |
| ५००१- १०,००० पर्यंत साठा | - | ०४टक्के |
| १०,००१-२०,००० पर्यंत साठा | - | ०३ टक्के |
| २०,००१ पेक्षा जास्त साठा | - | ०१ टक्के |

**III] <u>सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती :-</u>**

वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती पुढीलप्रमाणे राहतील व त्यांचा समावेश संबंधित निविदाधारक/परवानाधारकासोबत करावयाच्या करारपत्रात न चुकता करणे अनिवार्य असेल:-

१) निविदाधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच निविदाधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

२) माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दिनांक २७/०२/२०१२ रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती गटातून जास्तीत जास्त ३ मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढ्या खोलीपर्यंतच निविदाधारक/ परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

३) नदी पात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही, निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदी पात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही. याबाबत योग्य ती दक्षता निविदाधारकाने घेणे आवश्यक राहील.

४) निविदाधारकास निविदेत मंजूर केलेल्या वाळूसाठ्याइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

५) वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधी व्यतिरिक्तच्या काळात केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

६) कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पूलाच्या कोणत्याही बाजुने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

७) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

८) सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

९) रस्ते/ पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही.

१०) नदीपात्रातून वाळूची डेपोपर्यंतची वाहतूक ट्रॅक्टर अथवा कमाल ६ टायरच्या (टिपर) मार्फत करण्यात यावी.

११) निविदाधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्याच्या बाजूला डेपो निर्मिती करावी.

१२) निविदाधारकाला नदीपात्रातून / नाल्यातून रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी निविदाधारकाने घ्यावयाची आहे.

१३) निविदाधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

१४) निविदाधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन व डेपोमध्ये साठवणूक केलेल्या दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांना उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

१५) वाळू डेपोतून वाळू विक्री साठी ग्राहकाचा आधार क्रमांक अनिवार्य राहील.

१६) एका कुटुंबास एका वेळी कमाल ५० मेट्रिक टन वाळू/रेती अनुज्ञेय असेल. त्यानंतर वाळू हवी असल्यास वाळू मिळाल्याच्या दिनांकापासून १ महिन्यानंतर वाळूची मागणी करता येईल.

१७) ज्या ग्राहकांना वाळू हवी आहे त्यांनी महा खनिज (Mahakhanij) या प्रणालीवर वाळू खरेदी मागणीची नोंद करणे आवश्यक राहील. ज्या ग्राहकांना हे शक्य नसेल त्यांनी सेतू केंद्रामार्फत ही मागणी नोंद करु शकतील. सेतू सेवा केंद्राचे प्रक्रिया शुल्क जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावे.

१८) वाळूची मागणी नोंदविल्यानंतर १५ दिवसाच्या आत वाळू डेपोमधून वाळू घेउन जाणे ग्राहकावर बंधनकारक असेल. काही अपरिहार्य कारणामुळे विहित मुदतीत वाळूची उचल केली नाही तर संबंधित तहसिलदार हे मुदतवाढ देऊ शकतील.

१९) नागरीकांना वाळू डेपोतून वाळू घेऊन जाण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी परिवहन विभागाच्या सल्याने वाहन प्रकार निहाय प्रती किलोमिटर वाहतूकीचा दर निश्चित करुन ती माहिती त्यांच्या संकेतस्थळावर तसेच महाखनिज (mahakhanij) प्रणालीवर नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन द्यावी. तसेच, या दरांने वाळू वाहतूक करणा-या वाहतूकदारांची माहिती प्रसिद्ध करावी.

२०) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने / ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

२१) निविदाधारकाने नदी/खाडी पात्रातून वाळूचे उत्खनन करुन बांधकाम योग्य वाळूचा साठा वाळूडेपोमध्ये करणे आवश्यक राहील.

२२) निविदाधारकाने त्याच्या निविदास्थळातील रेती / वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहनक्षमते इतक्याच परिमाणाची वाळू वाहतूक करावी. वहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे, असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी.

२३) रेती / वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास निविदाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

२४) रेतीचे/ वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास निविदाधारकाने/ ठेकेदाराने विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

२५) शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय निविदाधारकास निविदा/ ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदेनंतर भागीदारही घेता येणार नाही.

२६) निविदाधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून किती उत्खनन केले आहे त्याचे विवरणपत्र दर महिन्याच्या १० तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. जे निविदाधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द वाळू निविदा रद करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांना असतील.

२७) अवैध वाळू / रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील नियम ४८(७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

२८) निविदाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या वाहनांची माहिती तहसिलदार / जिल्हाधिकारी यांना द्यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२९) नदी/खाडी पात्रातून डेपोपर्यंत वाळू/रेती वाहतूक करणा-या ट्रॅक्टर (ट्रॉली) अथवा कमाल ६ टायरच्या (टिपर) या वाहनांना पिवळा रंग देणे बंधनकारक राहील

३०) वाळूचे / रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी / नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबंधीत निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

**V] निविदाधारकाने अटी/शर्तीचे उल्लंघन केल्यास करावयाची कारवाई :-**

१) निविदाधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांची निविदा पुन्हा पुन्हा लावून सुध्दा कोणीही निविदाधारक पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटाच्या निविदा होऊ शकत नाही, अशाप्रकारे संगनमत करून शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणाऱ्या निविदाधारकास संपूर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

२) पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास निविदाधारकाडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, निविदा रद्द करण्यात यावी. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

३) वाळू डेपोमधून ग्राहकासाठी वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध ETP वाहतूक पास आहे किंवा नाही याची शहानिशा करण्यात यावी. याबाबतच्या निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहन चालकाकडे वैध ईटीपी किंवा बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही तर सदर वाळूचे उत्खनन / वाहतूक अवैध समजून संबंधिताविरुद्ध महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

४) अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधीत निविदाधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता कलम, ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व कलम४८(८) मधील तरतूदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

५) तसेच वाळूचे अवैध उत्खनन / वाहतूकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ या अधिनियमान्वये कारवाई करण्यात यावी.

६) निविदाधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

**प्रकरण क्रमांक - सहा**

**निविदा**

**I] वाळू डेपोसाठी शासकीय अथवा खाजगी जमीन उपलब्ध करणे:-**

नदी/खाडीपात्रातून वाळू/रेतीचे उत्खनन करुन वाळू डेपोपर्यंत वाहतूक करण्यासाठी लागणारा खर्च याबाबी निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी निविदा काढ़ण्यापुर्वी वाळू डेपोसाठी शासकीय अथवा खाजगी जमीन निश्चित करण्याची कार्यवाही करावी. तद्नंतरच निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा.

वाळू डेपो निर्मितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शासकीय जमिनीसाठी भाडे आकारण्यात येणार नाही. तथापि, शासकीय जमीन उपलब्ध न झाल्यास खाजगी जमीनीसाठी प्रती एकर प्रती वर्ष रुपये ३०,०००/- इतक्या मर्यादेपर्यंत भाडेपट्याची रक्कम अनुज्ञेय राहील. या करीताचा आवश्यक निधी स्वतंत्रपणे उपलब्ध करुन दिला जाईल.

**II] निविदा प्रक्रिया :-**

**वाळू गटातून वाळुचे उत्खनन, उत्खनननानंतर वाळुची डेपोपर्यंत वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन या बाबीवरील होणारा खर्च गृहित धरुन दर (Rate) रुपये प्रती मेट्रीक टन या प्रमाणे एकच निविदा काढण्यात यावी. यामध्ये खालील खर्चाचा समावेश राहील :-**

१. नदी/खाडी पात्रातील वाळूचे उत्खनन, बांधकाम योग्य वाळूची डेपोपर्यंत वाहतूक, वाळूच्या भराई-उतराईसह वाहतूक खर्च.
२. डेपो निर्मिती व डेपो व्यवस्थापन
३. डेपो निर्मिती व डेपो व्यवस्थापन खर्च (तारेचे काटेरी कुंपन, डेपोच्या सर्व बाजुनी सीसीटीव्ही लावणे, विद्युत पुरवठा (Adequate Illumination), इंटरनेट सह सर्व सुविधा, कंट्रोल रुम, कर्मचारी वर्ग, भराईसाठी यंत्रसामुग्री इत्यादी)
४. इलेट्रॉनिक वजनकाटे मे. ५० टन क्षमतेचे (Electronic Weighbridge with Digital Display ) बसविण्यात यावेत,
५. ग्राहकाच्या वाहनामध्ये वाळू भराई खर्च.
६. वाळू डेपोच्या आकारानुसार कर्मचारी वर्गाची निश्चिती जिल्हाधिकारी यांनी करावी.

७. Environment management plan च्या अमंलबजावणीसाठी येणारा खर्च निविदा धारकांकडून करण्यात येईल.

८. खाडीपात्रातील वाळु गटाच्या जल सर्व्हेक्षण शुल्कापोटी (हायड्रोग्राफीक सर्व्हे फी) येणारा खर्च निविदाधारकाकडून करण्यात येईल.

**III] वाळू/रेती विक्रीची किमत :-**

१) प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी संपूर्ण राज्यासाठी रुपये ६००/- प्रती ब्रास (रुपये १३३/- प्रती मेट्रीक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित करुन स्वामित्वधनाची रक्कम माफ करण्यात यावी. याशिवाय वाळू वाहतूकीचा खर्च नागरीक करतील.

२) त्याशिवाय शासना मार्फत आकारण्यात येणारे जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधी व वाहतूक परवाना सेवा शुल्क, इत्यादी खर्च अनिवार्य राहील.

**IV] लहान वाळू गटासाठी डेपोनिर्मिती :-**

जिल्ह्यामध्ये अथवा तालुक्यामध्ये प्रत्येक लहान वाळू गटासाठी स्वतंत्रपणे डेपो निर्मिती करणे किफायतशीर नसल्यास किंवा शक्य नसल्यास जिल्हाधिकारी अशा वाळू गटांच्या समुहासाठी एकच डेपो निर्मिती करु शकतील. व अशा ठिकाणी डेपो व्यवस्थापनाचे काम कोणत्या निविदाधारकाकडे सोपविण्यात येणार आहे याचा स्पष्ट उल्लेख निविदेत करावा.

V] नदी/खाडीपात्रातील वाळू गटातून वाळूचे उत्खनन, वाळू डेपोपर्यंतची वाहतूक, डेपो निर्मिती व व्यवस्थापन खर्च तसेच, वाळू डेपोसाठी खाजगी जमिनीसाठी लागणारा भाडेपट्याचा खर्चाची रक्कम शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल.

VI] राज्यातील पूर परिस्थितीचा धोका कमी करणे, नदीचा प्रवाह पूर्ववत/सुरळीत करणे यासारख्या बाबींसाठी जलसंपदा विभागाने नदी पात्रातील काही गट/स्थळ निश्चित केल्यास अशा ठिकाणाहून गाळ, गाळ मिश्रित वाळू काढण्याबाबत जलसंपदा विभाग जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करु शकेल. त्याचप्रमाणे खाडीपात्राकरीता महाराष्ट्र सागरी मंडळही जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करु शकेल अथवा खाडीतील प्रवाह सुयोग्य राखण्यासाठी मंडळाने उत्खनन केल्यास त्यातील वाळू वरीलप्रमाणे नागरीकांना विक्री करता येईल.

## प्रकरण क्रमांक - सात

**प्रतिबंधात्मक उपाययोजना :-**

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होणार नाही, यासाठी संबंधित विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**१)** प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

**२)** वाळू गटा मध्ये CCTV कॅमेरे बसविण्याबाबत :

a. प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी २४/७ छायाचित्रण होण्यासाठी निविदा धारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत निविदाधारकांना सोसणे आवश्यक राहील. तसेच निविदा न झालेल्या वाळूगटातील वाळूची अवैध वाहतूक होवू नये यासाठी ज्या ठिकाणाहून वाहतूक होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व यासाठी

जिल्हा नियोजन समिती यांच्याकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

b. निविदाधारकांनी बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. निविदाधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील.

c. तहसिलदारांनी सदर सीडी मधील छायाचित्रण आपल्या अधिनस्त यंत्रणेमार्फत तपासून घ्यावे. संबंधित तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अधूनमधून स्वतः देखील अशा छायाचित्रणाची तपासणी करावी.

३) प्रत्येक गाव कामगार तलाठ्याने त्याच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटास/वाळू डेपोस नियमितपणे भेट देणे आवश्यक राहील. त्यासाठी संबंधित निविदाधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करून दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. तलाठ्याने वाळूगटास/वाळू डेपोस भेट दिल्यानंतर दैनंदिन भेट वहीमध्ये त्याची नोंद करुन दिनांकित स्वाक्षरी करावी.

४) संबंधित मंडळ अधिकाऱ्यानेही नियमितपणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटाची/वाळू डेपोची पाहणी करून, त्याची नोंद उक्त दैनंदिन भेट वहीमध्ये करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

५) संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील वाळूगटाला/वाळू डेपोला वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन त्याची दैनंदिन भेटवहीत नोंद करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

६) अधिकाऱ्यांनी रेतीगटाची तपासणी करताना खालील बाबी कटाक्षाने पहाव्यात :-

a. उत्खननास प्रारंभ केल्यापासून तपासणीच्या दिनांकापर्यंत उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व तपासणीच्या दिवसापर्यंत उत्खननाच्या ठिकाणी असलेला वाळूसाठा.

b. नदी पात्रात पूल असल्यास त्या पुलाच्या आजूबाजूस तसेच बेंच मार्कच्या आजूबाजूस व बेंच मार्कच्या खाली वाळू उत्खनन केले जात आहे किंवा कसे याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी

c. नदीच्या काठाजवळच्या लगतच्या भागामध्ये उत्खननासाठी तयार करण्यात आलेला खाणकाम आराखडा व त्यानुसार प्राप्त झालेल्या पर्यावरण मान्यतेमध्ये समाविष्ट केलेल्या अटी शर्तीनुसार उत्खनन करण्यात यावे.

७) जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी बाबतची वरील मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत किंवा कसे, याची खात्री करुन घ्यावी. तपासणीनंतरही एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अवैध वाळू उत्खनन/ वाहतूक अव्याहतपणे होत असल्याचे निष्पन्न झाल्यास, संबंधित अधिकाऱ्याचे अवैध उत्खनन / वाहतूक करणाऱ्या व्यक्तींशी संगनमत आहे असे गृहीत धरुन संबंधिताविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात यावा.

## प्रकरण क्रमांक - आठ

### १) सनियंत्रण

a) वाळू वाहतूकीसाठी केंद्र शासन / राज्य शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या निदेशांनुसार सनियंत्रण प्रक्रियेचा वापर करणे अनिवार्य राहील. तसेच वाळूच्या अवैध उत्खनन/ वाहतूकीस प्रभावीपणे आळा घालण्याच्या दृष्टीने उक्त सनियंत्रण प्रकियेबरोबरच महाखनिज या संगणक प्रणालीचा वापर करणे बंधनकारक राहील.

b) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन / वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी तहसिल, उप विभाग, जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर पोलीस, परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी व महसूल अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र भरारी / दक्षता पथके अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी निर्माण करावी. सदर पथकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध उत्खनन व वाहतूकीस अटकाव करणे ही या पथकाची सामुहिक जबाबदारी राहील.

c) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन / वाहतूकीची घटना वा प्रकरण ज्या महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रात उघडकीस येईल, ते अधिकारी / कर्मचारी सदर प्रकरणात जबाबदार आहेत काय, याची कसून तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये संबंधित स्थानिक अधिकारी / कर्मचारी अवैध उत्खननाकडे हेतूतः दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले किंवा त्यांनी अवैध उत्खनन / वाहतूकीवर पुरेसे नियंत्रण न ठेवल्याचे आढळल्यास त्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून, त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

**२) उत्खनन व विक्रीचा मासिक अहवाल-**

प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकूण वाळूघाट किती आहेत, त्यापैकी किती वाळूघाटांची निविदा काढण्यात आली व किती वाळूघाटांची निविदा काढली नाही, या वाळूघाटातून दर महिन्याला किती मेट्रिक टन वाळू उत्खनन करण्यात आले व डेपोमधील वाळूची विक्री, तसेच जिल्ह्यामध्ये अवैध उत्खननाची किती प्रकरणे प्रत्येक महिन्याला उघडकीस आली व किती प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले, याबाबतचे मासिक विवरणपत्र अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांनी शासनासं व संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांना सादर करावे.

**प्रकरण क्रमांक - नऊ**

**जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमधून करावयाच्या कामाबाबतच्या सूचना :-**

केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकास व विनियमन) सुधारणा अधिनियम,२०१५ मधील कलम ९ (ब) मध्ये राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ ०६१५/५१/प्र.क्र.३४ /उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, खनिकर्म जिल्ह्यातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याच्या अनुषंगाने अन्य उपाययोजनाकरीता अनुज्ञेय असलेल्या निधीमधून पर्यावरण विषयक बाबींसाठी होणारा खर्च भागविण्यात यावा.

जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करून, सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक तसेच वाळू निविदाधारककाकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायती क्षेत्रातील रस्ते, आरोग्य, इत्यादी साठी निधी मार्गदर्शक सूचनानुसार देय आहे.

शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडीएफ एमडीएफ ०६१५/५१/प्र.क्र.३४ /उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या ५ टक्केपेक्षा जास्त नाही अशी रक्कम प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्यासाठी खर्च करता येते. सदर मर्यादेच्या अधिन राहून उक्त निधीतून खालील बाबींकरीता गरजेनुसार खर्च करता येऊ शकेल :-

१) अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना करणे.

२) जप्त केलेले वाहन बंद स्थितीत असल्यास सदर वाहन सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी उपाययोजना करणे.

३) जप्त केलेल्या वाळूसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नियुक्त करणे.

४) दक्षता व निरीक्षण पथकासाठी खाजगी वाहने भाड्याने घेणे.

५) वाळू उपलब्धतेचा अंदाज काढणे, वाळू उत्खननाचे पर्यवेक्षण व सनियंत्रण याकरीता नावीन्यपूर्ण प्रकल्प/ तंत्रज्ञान विकसीत करणे.

**प्रकरण क्रमांक - दहा**

**वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती**

निविदा झालेल्या वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननासाठी निविदाधारकास येणाऱ्या अडचणी व विविध व्यक्ती व संस्थांकडून वाळू उत्खननाबाबत करण्यात येणाऱ्या पर्यावरणविषयक तक्रारींचे देखील जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती कामकाज पाहील.

१) रेती / वाळू स्थळातून निविदेच्या अटी/शर्तीचे उल्लंघन करून वाळूचे उत्खनन होते, अवैध / नियमबाह्य वाळू उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो, वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची/रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून प्राप्त झाल्यास, अशा तक्रारीची तहसिलदार यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर जिल्हास्तरीय समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

२) वाळू उत्खनन करण्यास निविदाधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास अथवा निविदाधारकास वाळू उत्खनन करण्यास होणाऱ्या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबळ कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास निविदाधारकाने त्वरीत जिल्हास्तरीय समितीसमोर अर्ज करावा. याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर समितीने अशा वाळू / रेती स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन, त्या वाळू/रेती स्थळाचे पुनश्चः सर्वेक्षण करावे, तसेच तक्रारीतील अन्य मुद्यांबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन, संबंधीत वाळू / रेती गटातून वाळचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत १५ दिवसांत उचित निर्णय घ्यावा व तो निर्णय संबंधीत निविदाधारक, तक्रारदार व क्षेत्रिय महसूल अधिकाऱ्यांना कळवावा. जिल्हास्तरीय समितीने वाळूगटाच्या सर्वेक्षणाच्या वेळी व्हिडीओ चित्रीकरण करण्याची दक्षता घ्यावी.

३) ज्या तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल, अशा तक्रारदाराला त्याबाबत संबंधीत विभागीय आयुक्तांकडे अपील करता येईल. संबंधीत विभागीय आयुक्त, जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसात उचित निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधित तक्रारदार व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.

४) वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर समितीने चौकशी करुन, ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशावेळी निविदाधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात यावा.

वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर या शासन निर्णयातील काही तरतूदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी या शासन निर्णयातील तरतूदी अंतीम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

या धोरणाच्या अनुषंगाने धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनास/विभागास राहतील.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८१/२०२३/व्यय-९ दिनांक ०२ मार्च , २०२३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०४१९१९१७५९०६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( शिवाजी चौरे )**
**अवर सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
६) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
९) सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१०) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
११) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१२) सर्व मंत्रालयीन विभाग.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१५) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सर्व उपविभागीय अधिकारी.
१९) सर्व तहसिलदार.
२०) निवडनस्ती.